कृषी क्षेत्रात स्वावलंबी बनण्यासाठी शेतीसोबत जोडव्यवसायाचे ज्ञान आवश्यक : राज्यपाल

पुणे / प्रतिनिधी

कृषीमध्ये आधुनिक ज्ञान आणि प्राचीन ज्ञानाचा संगम करून पुढे जाण्याची गरज आहे. नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यासह दुग्धव्यवसाय आणि शेतीशी निगडित जोडव्यवसायांतील सर्वांगीण ज्ञान प्राप्त करुन काम केल्यास कृषी क्षेत्रात स्वावलंबी बनणे शक्य आहे, असा विश्वास राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी व्यक्त केला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि ग्रीव्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी महाविद्यालयात आयोजित 'महा ग्रीव्हिजन २०२२' च्या तिसऱ्या क्षेत्रीय संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी राज्यपाल कोश्यारी बोलत होते. 'नैसर्गिक व सेंद्रिय शेती: जागतिक परिपेक्ष आणि कृषि उद्योजकता' हा या दोन दिवसीय संमेलनाचा मुख्य विषय आहे.

कार्यक्रमास महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील, गुजरात नॅचरल अँड ऑरगॅनिक फार्मिंग अँड ग्रीकल्चर युनिव्हर्सिटी आनंदचे कुलगुरु डॉ. सी. के. टिंबाडिया, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, महा ग्रीव्हिजनचे आयोजन सचिव जयंत उत्तरवार, संयोजक मनीष फाटे, कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, संचालक विस्तार शिक्षण डॉ. तानाजी नरुटे आदी उपस्थित होते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे असे सांगून राज्यपाल श्री. कोश्यारी म्हणाले, आपल्या देशाला एके काळी अमेरिकेतून अन्नधान्य आयात करावे लागत होते. आज आपण कृषि उत्पादनात केवळ स्वयंपूर्ण नसून परदेशात कृषि उत्पादनांचे निर्यात करतो. आपली अन्नधान्याची गरज लक्षात घेता कृषि क्षेत्रात प्रयोग करून अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश स्वयंपूर्ण झाला.

आज कृषि निविष्ठांच्या अतिवापरामुळे शेती नापिक होत आहे. आपल्याला आज शेतीमध्ये नवीन पद्धतीची गरज आहे. आपल्याला अतिप्राचीन नैसर्गिक शेतीकडे वळण्याची आवश्यकता आहे. देशी गाईचे शेण, गोमूत्राचे नैसर्गिक शेतीमध्ये महत्त्व वाढत आहे.

राज्यपाल म्हणाले, गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्रातील सुभाष पाळेकर यांच्याकडून नैसर्गिक शेतीची माहिती घेतली त्याचे प्रयोग कुरूक्षेत्रमध्ये व त्यानंतर हिमाचल प्रदेशात केले. त्याचा चांगला लाभ शेतकऱ्यांना झाला. त्याची माहिती घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातला नैसर्गिक शेतीचे मॉडेल करण्याचे निश्चित केले आणि त्यानुसार देशातील पहिले नैसर्गिक शेती विद्यापीठ तेथे स्थापन केले.

जीआय टॅगींगसारख्या बाबींचा शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अधिक भाव मिळून फायदा होईल. त्यामुळे कृषिमध्ये आधुनिक आणि प्राचीन ज्ञानाचा संगम करून पुढे गेले पाहिजे. कोरोना कालावधीमध्ये सर्व क्षेत्र थांबले तेव्हा कृषि क्षेत्र सुरूच राहिले. आपण कृषीचे विद्यार्थी असल्याबद्दल अभिमान बाळगा असे सांगून शेतीच्या सेवेतून धरतीमातेचे ऋण अदा करा, असा सल्ला श्री. कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कुलगुरू डॉ. टिंबाडिया म्हणाले, गुजरात मध्ये स्थापित देशातील पहिल्या नैसर्गिक शेतीच्या कृषि विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांच्या शेतावर संशोधनाचे काम सुरू असून १ लाख ७० हजार लोकांनी आपल्या शेतात प्राकृतिक शेतीचे चांगले प्रकल्प घेतले. नवीन पिढीच्या आरोग्यासाठी नैसर्गिक शेतीकडे वळण्याची गरज आहे. छोट्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती उपयुक्त व्हावी यासाठी संशोधन सुरू आहे. उत्कृष्ट अन्न उत्पादन आणि मूल्यवर्धनाला मोठी संधी आहे. एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमात नैसर्गिक शेतीचा समावेश करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असेही ते म्हणाले.

कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील म्हणाले, कृषि उत्पादकता वाढविण्याच्या प्रयत्नातून किटकनाशके, खतांच्या अतिवापरामुळे कर्करोगाबरोबर अनेक आजार वाढत आहेत. शेतीतील कर्ब कमी होत आहे. त्यामुळे नैसर्गिक शेतीचे महत्व वाढते आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयानुसार सर्वांना पुरेसे अन्न द्यायचे आहे, मात्र ते सुरक्षित आणि सकस असेल याची काळजी घ्यायची आहे. केंद्र शासनाने नुकतेच १ हजार ५०० कोटी रूपये नैसर्गिक शेती आणि सेंद्रीय शेतीसाठी जाहीर केले आहे. त्यामुळे या क्षेत्राची निश्चितपणे वाढ होईल. महात्मा फुले कृषी विद्यापीठा नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम घेत आहे, असेही ते म्हणाले. यावेळी ग्रीव्हिजनचे राष्ट्रीय सहसंयोजक शुभमसिंह पटेल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्री. उत्तरवार यांनी केले. कार्यक्रमात संमेलनाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास राज्यातील कृषि महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

थोडक्यात

अतिक्रमण व सेवा वाहिन्या काढून घेण्याचे आवाहन

पुणे : राष्ट्रीय महामार्ग क्रमाक ४ वरील खेड शिवापूर-नवीन कात्रज बोगदा-नवले पूल- वारजे दरम्यान दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्यांवर अनाधिकृतपणे करण्यात आलेले अतिक्रमण तसेच सेवा वाहिन्या ७ दिवसाच्या आत स्वखर्चाने काढून घेण्याचे आवाहन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्यावतीने करण्यात आले आहे.

मिळकतधारकांनी अनाधिकृतपणे केलेले अतिक्रमण व विनापरवाना बांधकाम मुदतीत काढून न घेतल्यास ती दि कन्ट्रोल ऑफ नॅशनल हायवेज (लॅन्ड अँड ट्राफिक) क्ट २००२ अन्वये निष्कासित करण्यात येतील तसेच त्याचा खर्च व दंड संबंधितांकडून वसूल करण्यात येईल.

प्राधिकरणाच्यावतीने ही अतिक्रमणे काढताना, सेवा रस्त्याची सुधारणा करताना काही नुकसान, असुविधा झाल्यास याला प्राधिकरण जबाबदार राहणार नाही, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे पुणे येथील प्रकल्प संचालक संजय कदम यांनी स्पष्ट केले आहे.

समता पर्व कार्यक्रमांतर्गत तृतीयपंथीयासाठी विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन

पुणे / प्रतिनिधी

समाज कल्याण विभागाच्या 'समता पर्व' या कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, हडपसर क्षेत्रिय कार्यालय आणि सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ६ डिसेंबर रोजी २१३ हडपसर विधानसभा मतदार संघात तृतीयपंथीय व्यक्तींना मतदार ओळखपत्र, आधार ओळखपत्र नोंदणीसाठी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास हडपसर क्षेत्रिय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद काटकर, तहसिलदार तथा मतदार नोंदणी अधिकारी बालाजी सोमवंशी, नायब तहसिलदार राजेश कानसकर, समाज कल्याणच्या नेत्राली येवले, तृतीया फाऊंडेशनच्या अध्यक्ष श्रीमती कादंबरी आदी उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार श्री. सोमवंशी म्हणाले, संविधानाने सर्व नागरिकांना समान हक्क व अधिकार प्रदान केले. तृतीयपंथी व्यक्तींना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना मतदार ओळखपत्र, आधारकार्ड व ओळखपत्र देण्याचा या शिबिराचा उद्देश आहे. या नोंदणी शिबीरात जास्तीत जास्त तृतीयपंथीय व्यक्तींनी सहभाग नोंदवून लाभ घ्यावा यासाठी प्रशासनाने प्रयत्न केले आहेत. या कार्यक्रमात तृतीयपंथीय व्यक्तींनी सहभाग घेऊन मतदार ओळखपत्र, आधारकार्ड व ओळखपत्रासाठी नोंदणी केली.

जिल्ह्यात पोलीस अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान

पुणे : पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी त्यांना असलेल्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३६ च्या अधिकारान्वये पोलीस अधिकाऱ्यांना अधिकारांचे प्रदान केले आहेत.

३१ डिसेंबर रोजी नववर्षाचे स्वागत करण्याकरीता पर्यटकांची होणारी गर्दी व १ जानेवारी २०२३ रोजी पेरणेफाटा येथे जयस्तंभास मानवंदना देण्याचा कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व सर्व बंदोबस्ताचे प्रभारी अधिकारी यांना २५ डिसेंबर २०२२ ते ७ जानेवारी २०२३ रोजीच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत विविध अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे, त्यांनी वर्तणूक कशी ठेवावी या विषयी निर्देश देणे, अशा कोणत्याही मिरवणुका या कोणत्या मार्गाने कोणत्या वेळात काढव्यात किंवा काढू नयेत असे मार्ग व वेळा निश्चित करणे, सर्व मिरवणुकीच्या व जमावांच्या प्रसंगी व उपासनेच्या वेळी व कोणत्याही रस्त्याहुन किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक स्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा न होऊ देणे यासाठी योग्य ते आदेश देण्याचे अधिकार पोलीस अधिकाऱ्यांना असतील.

त्याशिवाय सर्व रस्त्यावर व रस्त्यामध्ये घाट किंवा घाटावर सर्व धक्क्यावर व धक्क्यामध्ये आणि सार्वजनिक स्नानांच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागामध्ये, देवालय आणि इतर सर्व सार्वजनिक स्थळी सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य ते आदेश देणे, कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ ढोल, ताशे, व इतर वाद्ये वाजविणे व गाणी गाण्याचे, शिंगे व इतर कर्कश वाद्ये वाजविण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ते आदेश देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी लोकांना उपद्रव होऊ नये म्हणून ध्वनीक्षेपकाचा (लाऊड स्पीकर) उपयोग करण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी योग्य ते आदेश देणे, सक्षम प्राधिकाऱ्यानी या अधिनियमांची कलमे क्र.३३, ३५, ३७ ते ४०, ४२, ४३ व ४५ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधिन असलेले व त्यास पुष्टी देणारे योग्य आदेश देणे, हे अधिकारदेखील प्रदान करण्यात आले आहेत.

रिक्षा चालकांना आंदोलन न करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

पुणे : राज्यात बेकायदेशिररित्या व विनापरवानगी चालणाऱ्या बाईक टॅक्सी पवर बंदी घालण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून गृह आणि परिवहन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत असून नागरिकांना होणारी असुविधा टाळण्यासाठी आणि जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती कायम राखण्यासाठी रिक्षा चालकांनी १२ डिसेंबरचे आंदोलन करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

रिक्षा चालकांनी केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी रिक्षा चालकांच्या न्याय्य मागण्यांबाबत विचार करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गठीत समितीमध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस उपआयुक्त (सायबर शाखा), पोलीस उपआयुक्त (वाहतूक), पोलीस उपआयुक्त(गुन्हे) आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीने ७ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत बाईक टॅक्सी पवर कारवाईबाबत पाठपुरावा करण्याच्या सूचना पोलिसांना केल्या आहेत.

जिल्हा प्रशासनाने रिक्षा चालकांच्या न्याय्य मागण्यांबाबत नेहमीच सहानुभूतीने विचार केला आहे. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर वाहतूक होऊ नये यासाठी प्रादेशिक परिवहन विभागातर्फेदेखील विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. बेकायदेशिर बाईक टॅक्सी प चालविणाऱ्या कंपनी विरोधात गुन्हेदेखील दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई सुरूच असून पवर बंदी घालण्याबाबत राज्याच्या सायबर शाखेकडे पोलीस उपआयुक्तांमार्फत पाठपुरवा करण्यात येत आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता रिक्षा चालकांनी आंदोलन करणे उचित होणार नाही. अशा आंदोलनामुळे नागरिकांची अधिक प्रमाणात गैरसोय होण्याची शक्यता आहे.

रिक्षा चालकांनी नेहमीच प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. शिवाय रिक्षा चालकांच्या समस्यांबाबतही प्रशासन संवेदनशिलतेने निर्णय घेत असते. स्वत: पालकमंत्र्यांनीदेखील त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. जिल्हा प्रशासनाकडून गृह आणि परिवहन विभागाकडेदेखील बाईक टॅक्सी पवर बंदी घालण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. हे लक्षात घेता रिक्षा चालकांनी आंदोलन करू नये आणि यावेळीदेखील प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन डॉ.देशमुख यांनी केले आहे.

बारामतीत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरलाच लुटारूंनी लुटले!

बारामती : बारामती शहरातील महिला सोसायटी समोरील ऑक्सीजन प्लांट जवळ रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास एमआयडीसी बारामती येथे इसम नामे देवेंद्र संतोष वेताळ (वय- २१ वर्ष व्यावसाय-वैद्यकीय शिक्षण रा. सध्या बॉईज हॉस्टेल मेडिकल कॉलेज बारामती) हा रविवार सुट्टीचा दिवस असल्याने काही आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी एकटाच सुभद्रा मॉल पेन्सिल चौक येथे पायी चालत गेला होता .तो खरेदी करून परत एकटा बॉईज हॉस्टेल दिशेने चालत येत असताना ऑक्सिजन प्लांट चे जवळ एक अज्ञात इसम मोटरसायकल वरून आला व त्याने शिवीगाळ दमदाटी करून देवेंद्र यांच्या खिशातील पंधरा हजार रुपये जबरदस्तीने मारहाण करून काढून घेतले त्या ठिकाणी दुसऱ्या मोटरसायकल वरती आणखी दोन इसम आले पैसे काढून घेतलेला व्यक्ती व ते एकमेकांशी बोलू लागले त्यावेळी पैसे घेतलेला व्यक्ती बाकी दोघांना सांगू लागला की मी याचे काढून घेतलेले पैसे हा मला परत मागत आहे .

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या क्रीडा स्पर्धांमध्ये पुणे विभागाला सर्वसाधारण विजेतेपद

पुणे : अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या राज्यस्तरावरील क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे विभागाने १३ सुवर्णपदकांसह एकूण २६ पदके मिळवून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. नियोजन विभागाचे प्रधान सचिव राजगोपाल देवरा यांच्या हस्ते अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्यावतीने शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी येथे ३ व ४ डिसेंबर रोजी आयोजित स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पुणे विभागाचे अपर आयुक्त महसूल डॉ. अनिल रामोड, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक डॉ. विजय आहेर, नियोजन विभागाचे उपायुक्त संजय कोलगणे आदी उपस्थित होते.

मुंबई, नागपूर, पुणे, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नाशिक विभागातील २७५ पुरूष खेळाडू आणि १४७ महिला अशा एकूण ४२२ खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेत विविध क्रीडा व सांस्कृतिक प्रकारात ३९ सुवर्ण, ३९ रौप्य आणि २३ कास्य पदके वितरीत करण्यात आली.

पुणे विभागाने १३ सुवर्ण, ८ रौप्य आणि ५ कास्य पदकासह एकूण २६ पदके मिळवून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. कोकण विभागाने १० सुवर्ण, १३ रौप्य आणि ३ कास्य पदकासह एकूण २६ पदके मिळवून दुसरे स्थान तर नागपूर विभागाने ५ सुवर्ण, ४ रौप्य आणि २ कास्य पदकासह एकूण ११ पदके मिळवून सर्वसाधारण तिसरे स्थान मिळवले. स्पर्धेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या. यावेळी भिमराव आसवले यांनी खेळाडूंना शपथ दिली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली.

सकारात्मक कामगिरीसाठी चांगले आरोग्य आवश्यक- राजगोपाल देवरा

उद्घाटननप्रसंगी बोलतांना प्रधान सचिव श्री. देवरा म्हणाले, अर्थ व सांख्यिकी विभागाच्यावतीने राज्यातील माहिती एकत्रित करुन वस्तुनिष्ठ माहिती नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी विश्लेषणात्मक स्वरुपात मांडणी करण्यात येते. स्पर्धेच्या युगात आपले काम गुणवत्तापूर्वक करण्यसाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून आरोग्य चांगले राखण्यासाठी मदत होते. आरोग्य चांगले असले तर कार्यालयीन कामकाजात सकारात्मक परिणाम दिसू लागतात. त्यामुळे सर्वांनी आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्याकरीता शासनाने ५ हजार रुपये देण्याची योजना आणलेली आहे. त्यांचा लाभ सर्व पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावा. आगामी स्पर्धेत विभागातील शंभर टक्के अधिकारी व कर्मचारी सहभागी होण्यासाठी प्रयत्न करावे, असेही ते म्हणाले. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अधिकारी व कर्मचाऱ्याला येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील असेही श्री.देवरा यांनी सांगितले.

जाहिर नोटिस

दिनांक- ५/१२/२०२२

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट पुणे पोट तुकडी हवेली (सध्या पुणे महानगरपालिका हद्दीतील) खालील वर्णन केलेल्या मिळकती या आमचे आशिल आनंद कांतिलाल छाजेड व त्यांच्या बहिणी यांचे वडिलोपार्जित मालकी वहिवाटीच्या होत्या व आहेत. परंतु दिनांक २७/०६/२००१ रोजी १) सुनिल चांदमल दुगड व २) किर्ती माणिकचंद दुगड दोघे रा. बिबवेवाडी पुणे ४११०३७ यांनी आमचे आशिलांकडुन खालील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत एक मुखत्यार पत्राचा दस्त नोटराइज करून घेतलेला होता.

दिनांक ०५/१२/२०२२ रोजीचे नोटीसने सदरचा तथाकथित दस्त हा आमचे आशिलाने रद्द केलेला आहे. त्यामुळे वरील दोन इसमांना मिळकतीबाबत कोणतेही हक्क व अधिकार राहिलेले नाहीत.

तरी या जाहिर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की,

खालील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत १) सुनिल चांदमल दुगड २) किर्ती माणिकचंद दुगड यांचेबरोबर खरेदी, विक्री, गहाणदान, बक्षीसपत्र इत्यादी प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारच व्यवहार करू नये. या उप्परही कोणीही व्यवहार केल्यास त्यांना मिळकतीबाबत कोणतेही हक्क व अधिकार मिळणार नाहीत. त्यासाठी ही जाहिर नोटीस देत आहोत.

१) मिळकतीचे वर्णन- तुकडी पुणे पोटतुकडी तालुका हवेली पुणे महानगर पालिकेच्या कक्षेतील जमीन -

गावाचे नाव	गट नंबर / सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर
१) आंबेगाव बुद्रुक	४३ आणि ६३ पैकी जमीन.
२) आंबेगाव खुर्द	३९ व ६२ पैकी जमीन.
३) कोंढवा बुद्रुक	८१, ९१, ९२, ९३ व ३ पैकी जमीन, (२७) ३२ पैकी.
४) कोंढवा खुर्द	४६, ५०, ५४,५६ व ६२ पैकी जमीन.
५) हडपसर	४९, ५०, ५३, ५९ व ६० पैकी जमीन.
६) कात्रज	१०, ११, ३३, ११५, ११८, १२०, १२१ व १२३ पैकी जमीन
७) धनकवडी	७, ८, २३, २५ व ३६ पैकी जमीन,
८) बिबवेवाडी	६२३, ६२४, ६४९, ६५० व ६५६ पैकी जमीन.
९) वडगाव शेरी	२२ व ५६ पैकी जमीन.
१०) पिसोळी	३२ पैकी जमीन.
(११) उरुळी देवाची	२३ पैकी जमीन.

२) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे पोटतुकडी तालुका मुळशी, मे. सब-रजिस्ट्रार साहेब यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे यांचे कक्षेतील जमीन - मौजे भोडे, सर्व्हे/गट नंबर. ४०, हिस्सा नंबर. ८ पैकी जमीन.

दिनांक- ५/१२/२०२२

सही/-
ॲडव्होकेट
(आर. के. आचार्य, श्रीगोंदा, जि. अहमदनगर.)
आनंद कांतिलाल छाजेड वगैरे ४ करिता-

शिक्का

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: पुणे

L&T Financial Services

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 01.12.2022 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. प्रसाद राजेंद्र लगड 2. विजयंती लगड	मालमत्तेचा पत्ता : फ्लॅट क्र. 7, 2रा मजला, देशमुख प्लाझा, ई विंग, अधिमाप्न 857 चौ.फू., मालमत्तेचा सर्वेक्षण क्र. 7, हिस्सा क्र. ए/15/16/17, अधिमापन क्षेत्रफळ 18500 चौ.फू., हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध - पूर्वेला किंवा त्या दिशेने - स. क्र. 7अ भाग दक्षिणेला किंवा त्या दिशेने - स. क्र. 6 चा उर्वरित भाग पश्चिमेला किंवा त्या दिशेने - देशमुख प्लाझा इमारत उत्तरेला किंवा त्या दिशेने - रस्ता	PUNHL17001288 PUNHL17001342	24.08.2022	रु. 3,48,627.6	रु.59,09,964.16	रु.34,86,276/-	23/12/2022	28/12/2022

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. ही ई-लिलाव विक्री अधिकृत अधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक ई-लिलावाच्या पद्धतीच्या मदतीने सरफेसी कायद्याच्या तरतुदींखाली करण्यात येत आहे.
2. हा सार्वजनिक ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **23/12/2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावात यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावाच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे ई-लिलावाच्या तारखेला म्हणजे **28/12/2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **29/12/2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शांताराम शेणॉय, मोबाईल +91 9822989925 पत्ता : एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411 005 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा एसएआरएफएईएसआय कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 09.12.2022
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक - अशोक विठ्ठल सोनवणे** RNI : MAHMAR/२०११/४०९८३. Email - lokmanthan.pune@gmail.com